दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३२३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१६ फेब्रुवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## कोरोना फोफावतोय, कठोर निर्णय घ्यावे लागतील : अजित पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात कोरोना रुग्णसंख्या पुन्हा एकदा डोकं वर काढू लागली आहे. त्यामुळं या धर्तीवर मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून पुन्हा एकदा कठोर निर्णय घ्यावे लागतील असे संकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. राज्यात डिसेंबरनंतर रविवारी एकाच दिवसात सर्वाधिक म्हणजे ४ हजारांहून अधिक कोरोनारुग्ण आढळून आले.

रविवारी नव्यानं कोरोनाची लागण झालेल्यांचा आकडा ४०९२वर पोहोचला होता. त्यामुळं ही बाब आरोग्य यंत्रणा आणि प्रशासनाच्या चिंतेत भर टाकून गेली. परिणामी कोरोना रुग्णसंख्येचा हाच वाढता आलेख पाहता नागरिकांनीही कठोर निर्णयाच्या तयारीत राहावं असे संकेत अजित पवार यांनी दिले. मुख्यमंत्र्यांशी मंगळवारी बैठक घेऊन यामध्ये चर्चेतून काही कठोर निर्णयही घ्यावे लागतील, त्यासाठी नागरिकांनी मानसिक तयारी ठेवावी असं पवारांनी नागरिकांना उद्देशून स्पष्टपणे सांगितलं. काही गोष्टींच्या बाबतीत वेळीच निर्णय न घेतल्यास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

# लॉकडाऊनमधील बिलाची तडजोड करायची आहे? मग हुंडेगिरींना हुंडा दिल्याशिवाय तडजोड होणार नाही!

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्युत वितरण कंपनीचा कारभार रायगड जिल्ह्यातील भ्रष्टाचाराच्या उंबरठ्यावर येवून ठेपला आहे. विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता नागरिकांना वेठीस धरुन लॉकडाऊनमधील न वापरलेल्या विद्युत प्रवा–हाचे बिल लावून तडजोडीसाठी आपले पाकीट भरल्याशिवाय कुठलीही तडजोड करायला तयार नसून अन्यथा नागरिकांना वेठीस धरुन विद्युत प्रवाह बंद करण्याची धमकी देत आहेत. त्यामध्ये सगळ्यात वरचा क्रमांक विद्युत वितरण कंपनीचे रोहे विभागाचे कार्यकारी अभियंता हुंडेगिरी यांचा लागत असल्याची चर्चा रायगड जिल्ह्यात सुरू आहेत. त्यामुळे रायगडातील विद्युत ग्राहक म्हणत आहेत की, हुंडेगिरींना हुंडा दिल्याशिवाय बिलाची तडजोड होत नाही.

रायगड जिल्ह्यात लॉकडाऊन नंतर झालेल्या चक्रीवादळाचा तडाखा मोठ्या प्रमाणात बसून होत्याचे नव्हते झाले. रायगडातील पेण, रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन या तालुक्याला मोठ्या प्रमाणात वादळाचा तडाखा बसला. त्यामध्ये डोंगराळ भाग असलेल्या रोहा, तळा, श्रीवर्धन, म्हसळा, या तालुक्याला जास्तीत जास्त बसला. तळा तालुक्याला तर वादळानंतर सुमारे एक महिना विद्युत ग्राहकांना अंधारात रहावे लागले होते. अशा परिस्थितीत नागरिकांनी सय्यम बाळगून विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना मदत करून विद्युत प्रवाह सुरू करण्यासाठी पोल उभे करण्यापासून विद्युत वाहिनी खेचण्यापर्यंत अहोरात्र मदत केली, असे असताना तळा तालुक्यातील विद्युत वितरण ग्राहकांना अव्वाच्या सव्वा बिले लादून ती योग्य बिले व सदोष बिले सुधारण्यासाठी नागरिकांनी विद्युत वितरण कंपनीच्या तळा विभागातील कार्यालयात खेटे घातले. परंतु विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता असलेले हुंडेगिरी हे रोह्यावरुन आपली लगाम आपल्या अधिकाऱ्यांमार्फत टाकून नागरिकांच्या खिशात हात घालत असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. म्हणूनच लोक म्हणत आहेत की, हुंडेगिरींना हुंडा दिल्याशिवाय बिलात तडजोड होणार नाही, अशी नागरिकांची खात्री पटली आहे. यामुळे नागरिकांना वेठीस धरणाऱ्या अशा बेजबाबदार हुंडेगिरींवर शासन काय कारवाई करते? याकडे साऱ्या रायगड जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## संक्षिप्त...

### पालिकेचे दोन लाचखोर निरीक्षक अटकेत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दुकानाच्या साइन बोर्ड संदर्भात कारवाई न करण्यासाठी ६० हजाराची लाच घेणाऱ्या पालिकेच्या दोन निरीक्षकांना अँटी करप्शन ब्युरोच्या पथकाने अटक केली. नितीन पाटणकर आणि हरिश्चंद्र घेगडमल अशी या दोन निरीक्षकांची नावे असून दोघेही पालिकेच्या मालाड येथील पी उत्तर विभागात कार्यरत आहेत.

चारकोप परिसरात राहणाऱ्या व्यावसायिकाचे पालिकेच्या पी उत्तर विभाग कार्यालयाच्या हद्दीत दुकान आहे. या दुकानावरील साइन बोर्ड संदर्भात कारवाईची प्रक्रिया पालिकेच्या वतीने सुरु करण्यात आली होती.

ही कारवाई केली जाऊ नये यासाठी व्यावसायिकाने अनुज्ञापन विभागातील निरीक्षक नितीन पाटणकर आणि हरिश्चंद्र घेगडमल यांची भेट घेतली. कारवाई न करण्यासाठी दोघांनी २ लाख २५ हजार रुपयांची मागणी केली. इतकी रक्कम नसल्याने तडजोडीनंतर ६० हजार रुपये देण्याचे ठरले. मात्र व्यावसायिकाला पैसे द्यायचे नसल्याने त्याने वरळी येथील अँटी करप्शन ब्युरोच्या कार्यालयात तक्रार केली.

अँटी करप्शन ब्युरोच्या अधिकाऱ्यांनी व्यावसायिकाने केलेल्या तक्रारीची प्राथमिक पडताळणी केली असता यामध्ये तथ्य आढळले. त्यानुसार सापळा लावण्यात आला. पाटणकर आणि घेगडमल यांनी सुदेश पॉल या व्यक्तीला व्यवसायिकाकडून ६० हजार घेण्यास पुढे केले. सुदेश याने रक्कम स्वीकारताच अँटी करप्शन ब्युरोच्या पथकाने तिघांनाही अटक केली.

## अष्टविनायक तीर्थक्षेत्र बल्लाळेश्वराच्या माघी गणेशोत्सवात पालीत भक्तिमळा फुलला





**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील अष्टविनायक धार्मिक तीर्थक्षेत्रापैकी प्रख्यात असलेल्या पालीतील बल्लाळेश्वर देवस्थानच्या माघी गणेशोत्सवात रायगड जिल्ह्यासह पनवेल, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, उपनगर व अन्य शहरातून, तसेच ग्रामीण भागासह खेड्यापाड्यातून भाविक दर्शनासाठी आले होते. सोमवारी (दि.१५) रोजी बल्लाळेश्वर मंदिर परिसर भाविक भक्तांनी फुलून निघाला होता. कोरोनाच्या पाश्वभूमीवर शासन नियम पालन करून माघी उत्सव अत्यंत शांततेत व साधेपणाने साजरा करण्यात आला. भाविकांनी पहाटेपासून बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. पालीत जणूकाही भक्तिमळा फुलला होता. उत्सवाच्या पाश्वभूमीवर पोलीस प्रशासन व देवस्थान प्रशासनाने चोख बंदोबस्त केला आहे. भक्तिभावाने दूरवरून आलेल्या पालख्या देखील या उत्सवात आकर्षण ठरल्या. श्री गणेशाच्या गजराने वातावरण भक्तिमय व प्रफुल्लित झाले होते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा उत्सवाला काही मर्यादा व बंधने आल्याने यात्रा आणि काही उपक्रम झाले नाहीत. कीर्तनाला देखील नेमकेच लोक उपस्थित होते. माघी महोत्सवानिमित्त प्रशासन व देवस्थान यांच्या समन्वयातून उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन करण्यात आले आहे. येणाऱ्या भाविक व भक्तगणांची गैरसोय होऊ नये यासाठी देवस्थान ट्रस्टने पुरेपूर खबरदारी घेत व्यवस्थापन केले आहे. महाप्रसाद झाला नाही तसेच पालखी देखील साधेपणाने निघणार असल्याचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप यांनी सांगितले. कोरोनाच्या प्रतिबंधासाठी राज्य शासनाने दिलेले सर्व प्रतिबंधात्मक उपाय करून व खबरदारी घेत मंदिर प्रशासनाने व्यवस्थापन केल्याचे दिसून आले. मास्क व सॅनिटायझरचा वापर करण्याच्या सूचना भाविकांना दिल्या जात होत्या. मंदिरात प्रवेशाचे व बाहेर पडण्याचे मार्ग वेगळे केल्याने एकाच ठिकाणी गर्दी झाली नाही. तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी जागोजागी सुरक्षारक्षक नेमले होते. अन्नछत्र व भक्तनिवास खुले करण्यात आले आहेत. तसेच भाविकांसाठी सर्वप्रकारच्या सोयीसुविधा उपलब्द करून देण्यात आल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले.

बल्लाळेश्वर मंदिर परिसरात रोषणाई व सजावट देखील केली आहे. मंदिराबाहेर मोठी आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. सकाळपासून भाविक दर्शनासाठी येत असून मोठ्या प्रमाणात गर्दी होत नाही आहे. भाविक नियमांचे पालन करत आहेत अशी माहिती देवस्थान ट्रस्टचे विश्वस्थ राहुल मराठे यांनी दिली. मंदिर परिसरात काही प्रमाणात खेळणी, पेढे, हारफुले, आदी विक्रेते व दुकाने सजली होती. शनिवार व रविवारी बल्लाळेश्वराचे दर्शन घेण्यासाठी गर्दी लोटली होती. गणेशाच्या जयघोषात जिल्ह्यातील अनेक ..../२

## दरोडा टाकण्यासाठी आलेल्या त्रिकूटास गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका ज्वेलर्सच्या दुकानात दरोडा टाकण्यासाठी आलेल्या टोळीतील त्रिकूटास गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने ताब्यात घेतले आहे.

खारघर येथील से.–१५ याठिकाणी असलेल्या सुवर्ण गंगा ज्वेलर्स या दुकानावर एक टोळी दरोडा टाकण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाला मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक कोल्हटकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक तांबे व भेदोडकर आणि त्यांच्या पथकाने या परिसरात सापळा लावला असता त्याठिकाणी दोन मोटारसायकलीवरूल चार जण व एस्टीम गाडीतील दोघेजण असे सहा जण मिळून ते लुट करण्याच्या उद्देशाने सदर दुकानाकडे जात असताना दबा धरून बसलेल्या गुन्हे शाखेच्या पथकाने त्या लुटारूंची धरपकड करण्याचा प्रयत्न केला असता या पथकाला सिल्वराज मनी नाडर, उर्फ लाल पट्टी, सोडालेमनी माड़ास्वामी हरिजन आणि काशिमनी माडास्वामी तेवर हे हाती लागले. तर बिरजू, मोटे व काळ्या हे तिघाजण संधीचा फायदा घेऊन पसार झाले. पकडलेल्या आर–ोपींची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे एक रिव्हॉल्व्हरसह जीवंत दोन काडतुसे, कोयता, लोखंडी सत्तूर व इतर साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. त्यांच्या अटकेमुळे अनेक लुटमारीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## घारापुरी येथील धोकादायक राजबंदर जेट्टीची मेरिटाईमच्या पाहणीमुळे लवकरच दुरुस्ती

**दै.रायगड नगरी । उरण**

मुंबई मेरिटाईम बोर्डाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे मागील वर्षी कोसळलेल्या घारापुरी येथील राजबंदर जेट्टीची दुरुस्ती करण्यात येणार आहे. घारापुरी ग्रामपंचायतीचे सरपंच बळीराम ठाकूर यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर अधिकाऱ्यांनी काल जेट्टीची प्रत्यक्ष पाहणी केली.

उरण,न्हावा समुद्रमार्ग घारापुरी लेण्या पाहायला येणाऱ्या पर्यटक आणि नागरिकांसाठी एकमेव ५० वर्षं जुनी असलेल्या राजबंदर जेट्टीचा स्लॅब मागील वर्षी कोसळला आहे. यामुळे जेट्टी चढ – उतार करण्यासाठी अत्यंत धोकादायक ठरली आहे. गेल्या वर्षी महाशिवरात्री निमित्ताने मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटक आणि नागरिकांसाठी अत्यंत धोकादायक ठरलेल्या जेट्टीच्या स्लॅबला खालून तात्पुरता उपाय म्हणून बांबूच्या वाश्यांनी टेकू देण्यात आला होता. या तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजनेमुळे महाशिवरात्री निमित्ताने घारापुरी बेटावर येणाऱ्या हजारो शिवभक्तांची तात्पुरती गैरसोय दूर झाली होती. घारापुरी सरपंच बळीराम ठाकूर यांनी जेट्टीच्या दुरुस्तीसाठी मुंबई मेरिटाईम बोर्डाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.



या नादुरुस्त जेट्टीच्या पाहणीनंतर कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी जेट्टी दुरुस्तीच्या ..../२

## दुर्लक्षाने होतेयं कचेरी रोडवर अतिक्रमण, वाहतूकीची कोंडी



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होत आहे. हायवेला जोडणाऱ्या प्रसिद्ध वर्दळीच्या कचेरीरोडवर सध्या यापूर्वी कधी नव्हे ती मुक्तपणे पार्किंग केलेली वाहने, तसेच रस्त्याच्या कडेला फळ, भाजी, मच्छी विक्रेते दिसून येत आहेत. माणगांव मधिल अत्यंत महत्वाची ठिकाण, शासकिय कार्यालये, शिक्षण संस्था याच रोडला जोडली गेली असल्याने रस्त्यावरुन कामा निमीत्त इतर तालुक्यातुन येणाऱ्या जाणाऱ्यांना तसेच स्थानिक आबालवृध्द, महिला नागरिकांना, विद्यार्थ्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. याची संबंधितांनी वेळीच दखल घेणे गरजेचे आहे. चुकीच्या सवयींकडे दुर्लक्ष करुन नंतर कारवाई करायची, याला म्हणायचे तरी काय ? असा सवाल ऐरणीवर आला आहे.

माणगांव शहराला अजूनपर्यंत स्वतंत्र असे भाजी, फळ, मच्छी मार्केट नसल्यामुळे हे विक्रेते राजरोसपणे नाईलाजास्तव मनात येईल तिथे आपले बस्तान मांडत आहेत. त्यामुळे रोडवर ये जा करणाऱ्या नागरिकांना, त्याचा त्रास सहन करावा लागतो. ग्रामपंचायतीची नगर पंचायत होऊन ५ वर्ष होऊन गेली तरीही माणगांवला स्वतंत्र मार्केटची सोय झालेले नाही. आता पुन्हा एकदा नगर पंचायत निवडणूक तोंडावर येऊन ठेपलेली आहे. किमान भविष्यात तरी स्वतंत्र मार्केटचा तिढा सुटेल का ? असा सवाल जनता विचारत आहे.

शासकीय कामासाठी ये–जा करताना ..../२



माघी गणेशोत्सवानिमित्त श्री गणरायाचे दर्शन घेताना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, नगरसेवक मनोहर म्हात्रे आदी.

## इंटरनेट केबलच्या खोदकामात नागोठणे-रोहा मार्गाच्या साईडपट्टीची दुर्दशा

### धुळीमुळे वाहनचालकांनाही होतोय त्रास : ठेकेदाराची मनमानी

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे–रोहा मार्गावर सध्या भारत संचार निगमच्या इंटरनेट केबलचे काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे. हे काम सुरु असतांनाच इंटरनेट केबल टाकण्यासाठी रस्त्याची साईड पट्टीचे मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आल्याने तिची दुर्दशा झाली आहे. तसेच रस्त्याची साईडपट्टी खोदल्यामुळे माती रस्त्यावर आल्याने मोठ्या वाहनांच्या रहदारीने उडणाऱ्या धुळीमुळे दुचाकीस्वार, रिक्षा, मिनीडोर व इतर छोट्या वाहन चालकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे.

भारत संचार निगमच्या रोहा येथील दूरध्वनी केंद्रातून पेझारी–पोयनाड येथील दूरध्वनी केंद्रापर्यंत ही इंटरनेट केबल टाकण्याचे काम गेले काही दिवस सुरु आहे. मात्र हे काम करीत असतांना या कामाच्या संबधित ठेकेदाराने योग्य ती काळजी न घेता मनमानी करून सुरु ठेवलेल्या कामामुळे रस्त्याची दुर्दशा झाली आहे. या इंटरनेट केबलचे काम करण्यासाठी रस्त्याच्या साईड पट्टीला जेसीबी यंत्राच्या सहाय्याने खोलवर खड्डा करण्यात येत आहे. हा खड्डा खोदत असतांना त्यामधील माती रस्त्यावर येत आहे. मात्र खोदलेल्या खड्ड्यात केबल टाकल्यानंतर तो खड्डा बुजवितांना तो योग्य पद्धतीने न बुजविता थातुरमातुर पद्धतीने बुजविल्याने रस्त्याच्या साईडपट्टीची वाताहत झाली आहे. त्यामुळे या साईड पट्टीमुळे पावसाळ्यातही वाहनचालकांना धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असे असतांनाही या प्रकाराकडे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रोहा उपविभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.



याप्रकरणी बांधकाम खात्याचे रोहा उपविभाचे अभियंता ए.एन. घाटगे यांनी सांगितले की, रस्त्याच्या बाजूला करण्यात येणारे खोदकाम व रस्त्याचे नुकसान याची तातडीने पाहणी करुन संबधितांवर पुढील कारवाई करण्यात येईल असेही घाडगे यांनी स्पष्ट केले.

# शिवसैनिक मयुरा तार्लेकर यांचे मुख्याधिकारी यांना नागरीसमस्यांबाबत लेखी निवेदन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक १२ बामणोली रोड येथील नागरिकांना भेडसावणाऱ्या नागरी समस्यां बाबत माणगांव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांना येथिल सामाजिक कार्यकर्त्या कट्टर शिवसैनिक मयुरा अजित तार्लेकर यांनी लेखी निवेदन दिले आहे. यावेळी शिवसेना शहरप्रमुख अजित चं. तार्लेकर तसेच शिवसेना नगरसेवक सचिन बोंबले, नितीन बामुगडे, कपिल गायकवाड, अजिंकेश जाधव, सुनील पवार, अनिल सोनार हे उपस्थित होते.

नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक १२ बामणोली रोड येथील संदेश राणे यांचे घराशेजारी नळपाईपलाईन फुटल्याने या ठिकाणी पिण्याचे पाणी मोठ्याप्रमाणात वाया जात असुन पुढील नळ कनेक्शन धारकांना पाणी पूरवठा होण्यास अडथळा येत आहे. तसेच येथिल डॉक्टर कामेरकर हॉस्पीटलचे बाहेर बाजुला असणारे नळ जोडणीचे कामही वारंवार दुरुस्ती करुनही नादूरुस्तच आहे. त्यामुळे या ठिकाणी गढुळपाणी येत आहे.

ज्यामुळे नागरिकांचे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच येथील वामन विध्दांस यांचे घरासमोर पाईप लाईनचे काम करताना संबंधितांकडून जो खड्डा खोदण्यात आला होता, तो न बुजवल्यामुळे या ठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारच्या या प्रभागातील काही नागरी समस्या दुर्लक्षीत असुन येथिल सामाजिक कार्यकर्त्या तथा कट्टर शिवसैनिक महिला मयुरा तार्लेकर यांनी याबाबत लेखी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांचे निदर्शनात आणल्या आहेत. याची तातडीने दखल घेत प्रत्यक्ष परिस्थितीची चौकशी करुन योग्यती कार्यवाही करण्याचे आश्वसान मुख्याधिकारी यांनी दिले आहे.

## म्हसळा येथील श्री गणेश मंदिरात माघी गणेशोत्सव उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दैवज्ञ समाज गणेश मंदिर ट्रस्ट म्हसळा यांच्या विद्यमाने म्हसळा येथील श्री गणेश मंदिरात सालाबाद प्रमाणे याही वर्षी माघी गणेश जयंती उत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने विविध कार्यक्रमांतर्गत दिनांक १५ फेब्रुवारी रोजी पहाटे सहा वाजता श्रींची अभिषेक पूजाविधी,दैवज्ञ समाज महिला मंडळ यांचे संगीत भजन,सिद्धीकला भजन मंडळाचे संगीत भजन,दिनांक १६ फेब्रुवारी विविध धार्मिक कार्यक्रमासाह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. माघी गणेशोत्सवानिमित्त रोहा येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार मंदार भावे यांच्या सुस्वर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. मंदार भावे यांनी मानवाचा जन्म ते त्याचा मृत्यू या मधील प्रवासाचे सविस्तर वर्णन करून मिळालेल्या मानव जीवनाचे सार्थक कसे करता येईल या बाबत भक्तांना सविस्तर प्रबोधन केले.जीवनात चांगले कर्म करणाऱ्या व्यक्तीचे जीवन सफल होते असेही कीर्तनकार मंदार भावे यांनी सांगितले. या उत्सवाच्या कार्यक्रमास दैवज्ञ समाज अध्यक्ष सुनील उमरोठकर, अनिल पोतदार, कमळाकर करडे, हिंदू समाज अध्यक्ष बालशेठ करडे, तालुका हिंदू समाज अध्यक्ष महादेव आदि मान्यवर उपस्थित होते.

मा.मुजावर साहेब कोर्ट
प्रोसेस जमा रु.५०/-

अर्जदाराचे वकील
ॲड.सचिता नंदकुमार गायकवाड

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९४/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.१६/४/२०२१

१) श्री.चंद्रकांत गोविंद सताने
वय : ६५ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
२) श्री.विनोद चंद्रकांत सताने
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.विशाखा निलेश कांबळे
पुर्वाश्रमीची विशाखा चंद्रकांत सताने
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
४) कु.विजेता चंद्रकांत सताने
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
५) सौ.पुजा सागर कांबळे
पुर्वाश्रमीची पुजा चंद्रकांत सताने
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.१, २, ४ रा.बी.३, रुम नं.१,
नंदकिशोर सोसायटी, सुकापूर,
पो.नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
अर्जदार क्र.३ रा.मु.शिवकर, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड
अर्जदार क्र.५ रा.मु.शिरगाव, ता.बदलापूर, जि.ठाणे — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. तारा चंद्रकांत सताने हे तारीख २४/०२/२०२० रोजी ज्यांचे राहते घरी मु.बी.३, रुम नं.१, नंदकिशोर सोसायटी, सुकापूर, पो.नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच कै. विशाल चंद्रकांत सताने हे दि.१०/१२/२०२० रोजी एम.एजी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे मयत झालेले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको संपादीत विकास अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन सिडको, सदनिका क्र.१, तळमजला, बिल्डींग नं.१५, सी/५, एम आय जी.२, प्लॉट नं.४/८, सेक्टर १८, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**त्याचे क्षेत्रफळ** 38.28 sq.mtrs.built-up+5-233 sq mtrs.

अर्जदार कै.तारा चंद्रकांत सताने व कै.विशाल चंद्रकांत सताने यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.११/२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

श्री.केदार नितीन सोमण, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१७८/२०२१
नि.नं.८
ने.ता.२४/३/२०२१

१) श्रीमती.निला भरत ठक्कर
वय : ६० वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्री.प्रतिक भरत ठक्कर
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.निखील भरत ठक्कर
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्र.१ ते ३ रा.प्रतिक, प्लॉट नं.२९/१-सी,
स्वामी नारायण मंदिराजवळ,
५२ बंगलो, पनवेल-४१०२०६ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी त्यांना कै.भरत प्रभुदास ठक्कर यांचे दि.०६/०८/२०२० रोजीचे अंतिम मृत्यूपत्राप्रमाणे मिळणाऱ्या खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात अर्जदार यांनी सदरचे प्रोबेट दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै.भरत प्रभुदास ठक्कर यांचे मालकीच्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**१) शॉप नं.१, ५, ६ व ७ गांधी अपार्टमेंट, प्लॉट क्र...., म.जी. रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**२) शॉप नंबर-१५, ओम सदनिका बिल्डींग, प्लॉट क्र...., उरण नाका, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**३) शॉप नंबर-३, गायत्री पेरेडाइझ, प्लॉट क्र..... करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड**

**४) प्रतिक बंगलो, प्लॉट क्र.२९/१-सी, स्वामी नारायण मंदिरा जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

वर अर्जदार ह्यांनी कै.भरत प्रभुदास ठक्कर यांचे दि.०६/०८/२०२० रोजीचे अंतिम मृत्यूपत्रान्वये मिळणाऱ्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत कोणतीही हरकत असल्यास व ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.निला भरत ठक्कर वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.भरत प्रभुदास ठक्कर यांचे पश्चात प्रोबेट दाखला मिळण्यास पात्र आहेत, असे सिद्ध झाल्यास त्यांना हे प्रोबेट दाखला मंजूर करेल.

आज दि.०९/०२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.पाठक सा़ो

ॲड.प्रिया मोरे

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१५३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२४/३/२०२१

१) श्रीमती.तेजस्विनी प्रदीप चौघुले
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.सायली प्रदीप चौघुले
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.ओम प्रदीप चौघुले
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
राहणार : फ्लॅट नं.३०४, बी विंग, तिसरा मजला,
शांतीवन सोसायटी, प्लॉट नं.ई/३७, सेक्टर ४,
खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील कै.प्रदीप सहदेव चौघुले यांचे २१/०८/२०२० रोजी महात्मा गांधी मिशन हॉस्पिटल, सेक्टर ६, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई येथे निधन झाले. मयत कै.प्रदीप सहदेव चौघुले यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**अ) मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट नं.३०४, बी विंग, तिसरा मजला, शांतीवन सोसायटी, प्लॉट नं.ई/३७, सेक्टर ४, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

**मुल्यांकन ३,५७,६९४/- (रुपये तीन लाख सत्तावन हजार सहाशे चौऱ्यानव्व)**

**ब) रुम नं.टी.एम.सी./के.बी.एन-एम-८२१, ओम शांती चाळ, चाळ नं.बी, भास्कर नगर, खारेगाव, कळवा (पूर्व), ता.जि.ठाणे ४००६०५**

**मुल्यांकन १,४०,०००/- (रुपये एक लाख चाळीस हजार मात्र)**

**क) भूमापन क्र. व उपविभाग ६९/अ येथील प्लॉट १११.५० चौ.मी. (१२०० फूट), मौजे : खर्डी-बुद्रुक, ता.माणगाव, जि.रायगड**

**मुल्यांकन ३०,५००/- (रुपये तीस हजार पाचशे मात्र)**

**एकूण मालमत्ता मुल्यांकन : रुपये ५,२८,१९४/-**

**(रुपये पाच लाख अठ्ठावीस हजार एकशे चौऱ्यानव्व मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/०२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस याद्वारे जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : तळोजा, ता.पनवेल येथील भूखंड नं.२६, सेक्टर २०, क्षेत्रफळ २४९.८२ चौ.मी. हा भूखंड सिडकोशी लिज डिड झालेला आहे. व सदर भूखंडावर नियोजित श्री कृपा दर्श को.ऑप.हौसिंग सोसायटी स्थापन करावयाची आहे. त्यासाठी सिडकोकडे ना हरकत दाखला मिळणेबाबत प्रस्ताव आम्ही तयार व सादर केला आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे

**भूखंडाचे तपशिल खालीलप्रमाणे**
**नोड तळोजा फाईल नं.४४१ तळोजा**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| मौजे तळोजा | २६ | २० | २४९.८२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर नियोजित श्री कृपा दर्श को. ऑप.हौसिंग सोसायटी स्थापन करावयाची आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस पत्र, लीन पोटगी दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध, हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्याचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून माझे अशिल सदर मिळकतीवर बांधलेली इमारत ही योग्य त्या कार्यालयात नोंदणी करतील व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.ई१२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## पेण येथील आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पेण**

आमदार रविशेठ पाटील यांच्या संकल्पनेतून आणि पेण नगरपालिकेचे नगरसेवक राजेश म्हात्रे तसेच उपनगराध्यक्षा वैशाली कडू यांच्या संयुक्त विद्यमाने पेण शहर व तालुक्यातील नागरिकांसाठी चिंचपाडा प्रभाग १० मधील रोटरी गार्डन येथे आज मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २४० जणांची तपासणी करण्यात आली.

सदर आरोग्य शिबिराचे उद्घाटन नगरपालिकेच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील व गट नेते अनिरुध्द पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

मुंबई येथील वेदिका पॉलिक्लिनिक व नवनिर्माण अपंग विकास पुनर्वसन संस्था यांचे तज्ज्ञ डॉक्टर डॉ. रामकृष्ण यादव, श्री.राजेश पाटील प्रभादेवी, डॉ.आयशा खान, डॉ.निलेश केळूसकर, वर्षा कदम तसेच सहकारी यांनी आरोग्य शिबिरात रुग्णांची तपासणी केली.

मे.बहिर सा़ो.यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
प्रल्हाद जी.खोपकर
निलेश द. हातमोडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.९०/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.२०/३/२०२१

१) श्रीमती.लक्ष्मी मारुती नाईक, वय : ६९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.नकुल मारुती नाईक, वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
३) कु.नंदा मारुती नाईक, वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
४) सौ.आशा यादव तारेकर, वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
१ ते ४ रा.कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.भारती भरत नाईक, वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.कुंदा नामदेव भोईर, वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.इ-१-१५, रुम नं.अे-१, सेक्टर १४, सी.के.टी.कॉलेज जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
७) श्रीमती.मंदा गोकुळ भोईर, वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
८) सौ.अरुणा अरुण म्हात्रे, वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धाकटा खांदा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ८ यांचे वडील मारुती शंकर नाईक हे तारीख २७/०९/२०२० रोजी मु.सुअस्था हॉस्पिटल रोडपाली, ता.पनवेल येथे मृत्यू पावले आहेत. मयत मारुती शंकर नाईक यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे मौजे : कोल्ही व मौजे : पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड. येथे खालील वर्णनाची जमीन मिळकती होत्या. सदर जमिनी नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत झाल्या आहेत.

मारुती शंकर नाईक यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे सामाईक असलेली खालील वर्णनाची मिळकती :-

**मिळकतीचे वर्णन**

**परिशिष्ट 'अ'**

सिडको कार्यालयातील वाटपपत्र क्र.सिडको/आंवित/पुनःस्थापना/कोल्ही/२०१५/३१४१ दिनांक ०५/०८/२०१५

| सांकेतिक क्रमांक | सर्वेक्षणा नुसार बांधकाम क्र. | बांधकामाचे पाया/ बांधीव क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाचा वापर | आदेशानुसार भूखंड वाटपात्री पात्रता ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र चौ.मी. | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| KOL-ICOGD-32 | KL-187<br>KL 188 | १००.५६ | निवासी | ११६.७६ | वडघर उपरोक्त प्रमाणे | ३ | २९४ | ३६०.०० |

परिशिष्ट 'ब'

सिडको कार्यालयातील वाटपपत्र क्र.सिडको/आंवित/पुनःस्थापना/२०१५/PAR-132+181/3162

| भूमी संपादन निवाडा क्र. | एकूण संपादीत जमिनीचा तपशिल | | बांधकाम असल्यास त्याचा तपशिल | | दि.१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णया नुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | दि.१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णया नुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | बांधकामा बद्दल पुनः स्थापनेसाठी वाटप करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकाम धारकाचे नाव | | | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| Paragon Dungi-181 | १७/३A<br>१९/१/१३<br>२२/२३<br>२४/२६ | ०-२०-२<br>०-३१-४<br>०-३१-०<br>०-०४-५ | -<br>-<br>-<br>- | -<br>-<br>-<br>- | २,०२०.००<br>३,१४०.००<br>३,१००.००<br>४५०.०० | ३१८.१५<br>४९४.५५<br>४८८.२५<br>७०.८८ | १० | ३८ | २०३० |
| Paragon 132 | २२/५<br>५२/६<br>५३/२ | ०-१९-७<br>०-१६-०<br>०-०५-० | -<br>-<br>- | -<br>-<br>- | १,९७०.००<br>१,६००.००<br>५००,०० | ३१०.१७<br>२५२.००<br>७८.७५ | १० | ३८ | २०३० |

अर्जदार हे वरील मिळकती संदर्भात मयतांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या मिळकतीच्या अर्जदार यांच्या हिश्याच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट श्रीमती.लक्ष्मी मारुती नाईक वगैरे ६ ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व अर्जदार मयत मारुती शंकर नाईक यांचे कायदेशीर वारसदार आहेत असा वारस दाखला मंजूर करेल. आज दि. रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**





## सर्वे डोंगर वळणावरील संरक्षक कठड्यांची दुरवस्था

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव-मुरुड रस्त्यावर सर्वे डोंगर वळणावरील संरक्षक कठड्यांची पार दुरावस्था झालेली असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असल्याबाबत वाहनचालक व प्रवासीवर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

मागील पावसाळ्यात या संरक्षक कठड्यांची तुटफुट झाल्याने पार दुरावस्था झालेली आहे.मुरुड-जंजिरा पर्यटनात या रस्त्यावर सातत्याने वाहनांची वर्दळ असते.

वेळप्रसंगी या ठिकाणी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन संरक्षक कठड्यांची दुरुस्ती करण्यात यावी. अशी मागणी केली जात आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## माघी गणेशोत्सवात पालीत भक्तिमळा फुलला

भागातून पदयात्रा आल्या होत्या. यात्रा व विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम रद्द केल्याने दरवर्षी च्या तुलनेत यंदा गर्दी कमी असल्याचे दिसून आले. यादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## जेट्टीची मेरिटाईमच्या पाहणीमुळे लवकरच दुरुस्ती

कामासाठी अंदाज पत्रक तयार काम सुरु करण्याचे आदेश दिले होते. मात्र कोरोना काळात सर्व कामकाज बंद झाल्याने जेट्टीच्या दुरुस्तीचे काम वर्षांपासून रखडले होते.परंतु धोकादायक राजबंदर जेट्टीच्या दुरुस्तीच्या कामासाठी शनिवारी मेरीटाईम बोर्डाचे सहाय्यक अभियंता पी.एल.बागुल यांनी पाहणी केली.त्यामुळे राजबंदर जेट्टीच्या कामाला आता गती मिळणार आहे.

## दुर्लक्षाने होतेयं कचेरी रोडवर अतिक्रमण

याच रोडचा वापर करावा लागतो. महामार्गावरील बाजारपेठेत अवैद्य पार्किंगमुळे वाहन चालकांवर कारवाई होत असल्यामुळे अनेक वाहन चालक कचेरी रोडवरच आपली वाहने तासनतास उभी करून जातात, अस बोललं जात आहे त्यामुळे वाहतूक कोंडी होते. त्यातच भाजी, फळ, मच्छी विक्रेत्यांच्या रस्त्या वरील अतिक्रमणाकडे नगरपंचायतीचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्यामुळे आता हे छोटे मोठे विक्रेते शहरातील मुख्यरस्ता व कचेरी रोड मार्गाच्या लगत बेकायदेशीर पणे बस्तान बांधुन बसल्याने वाहतुक कोंडीची समस्या तिव्रतेने जाणवत असल्याचे नागरिकांचे म्हणने आहे.

माणगांव हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण होऊ पाहत आहे. रेल्वे, मुंबई-गोवा महामार्ग तसेच दिघी माणगांव पुणे महामार्ग होत असल्याने शहराला अनन्य साधारण महत्व आले असुन लोकवस्तीत कमालीची वाढ होत आहे. त्यामुळे गेल्या १० वर्षांपासून महामार्गावरील या बाजारपेठेत दररोज लाखोंची उलाढाल होते. नुकतेच काही दिवसांपूर्वी काळनदी शेजारी असलेले अनाधिकृत मच्छी मार्केट सुद्धा कारवाई करून पूर्णपणे तोडण्यात आले आहे. ही कारवाई वेळीच केली असती तर आज जो त्रास या व्यावसायिकांना झाला आहे, हि परिस्थिती त्यांच्या वाट्याला आली नसती. आधी दिली ओसरी मग आता, हातपाय पसरी म्हणण्यात काय अर्थ आहे. वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माथेरानचा पर्यटन विकास करण्यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून प्रयत्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचा संपूर्ण परिसर हा बिनशेतीचा असल्याने सर्वांनाच केवळ पर्यटन शेतीवर अवलंबून राहावे लागत आहे.त्यामुळेच येणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी त्यांना पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून नेहमीच प्रयत्न केले जात असून बहुतांश विकास कामे सुध्दा प्रगतीपथावर आहेत. हेरिटेज वास्तूंना संरक्षण आणि त्यांचे जतन करताना पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची बाधा ,झळ पोहोचणार नाही याची काळजी घेतली जात आहे.त्यातच ब्रिटीश कालीन वास्तू यामध्ये कपाडिया मार्केट असो अथवा नगरपरिषदेच्या आवारातील भूभाग यांच्या स्वच्छतेकडे अधिकाधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. सार्वजनिक वाचनालयाची नव्याने किरकोळ दुरुस्ती,रंगरंगोटीची कामे प्रगतीपथावर असून हा एकंदरीत परिसर सुध्दा सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. याच बाजूला असणाऱ्या श्री. पिसारनाथ मार्केट मध्ये ज्या प्रमाणात पर्यटकांची रेलचेल असायला हवी ती उपलब्ध नाही त्यासाठी ह्या परिसराचे सुशोभीकरण सुरु आहे.याच वाचनालय भागात लहान मुलांना खेळण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे त्यामुळे इथे आपसूकच पर्यटकांना क्षणभर विश्रांती सह खरेदीसाठी या मार्केटमध्ये गर्दी होऊ शकते यातूनच इथल्या व्यावसायिक वर्गाला चांगल्या प्रकारे उत्पन्नाचे साधन प्राप्त होण्याची शक्यता आहे.

महत्वाच्या हेरिटेज वास्तूंना संरक्षण कवच,आणि इमारतीची दुरुस्ती माथेरान मध्ये शासनाकडून आलेल्या वैशिष्टयपूर्ण योजनेतील रक्कम ही केवळ हेरिटेज इमारतीच्या संरक्षण आणि विशेषतः एकप्रकारे सुरक्षा कवच असावे यासाठी खर्च करण्याची तजवीज असल्याने ज्या ज्या हेरिटेज वास्तू आहेत त्यामध्ये नगरपरिषद कंपाउंड, वाचनालय, नगरपरिषद प्राथमिक शाळा अशा ठिकाणी या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतील रक्कमेचा सदुपयोग करण्यात आला आहे.ही कामे पूर्ण करताना या





हेरिटेज वास्तूंच्या सौंदर्याला कुठल्याही प्रकारची बाधा पोहोचणार नाही याची दक्षता घेऊन कामे पूर्ण करण्यात येत आहेत. सर्व संरक्षण भिंती या जांभ्या दगडात बांधण्यात आलेल्या असून अंतर्गत भागात पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले आहेत त्यामुळे वास्तूच्या अंतर्गत भागातील मातीची धूप सुध्दा यामुळे थांबणार आहे.

मुख्य बाजारपेठ ठिकाणी शतकी पार केलेल्या कपाडिया मार्केटची दुरुस्ती करताना या हेरिटेज वास्तूला नवे रूप देण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करण्यात आला आहे.कपाडिया मार्केट या मुख्य बाजारपेठेतील भग्नावस्थेत पडलेले मोडके दगडी गाळे पुन्हा बांधण्यात आले. गंजलेले व गळके पत्रे बदलून नव्याने बसविण्यात येत आहेत. मोठया प्रमाणावर खर्च केला जात आहे त्यामुळे हा संपूर्ण कायापालट होत असून साहजिकच या मार्केटच्या सौंदर्यात भर पडत आहे. एक चांगल्या स्थितीत बाजारपेठ आणि फळभाजी मार्केट तसेच या एकंदरीत या परिसराला नवी झळाळी प्राप्त होताना दिसून येत आहे. नगराध्यक्षा प्रेरणा सावंत या भागाची पाहणी करून उत्तम दर्जाची कामे व्हावीत यासाठी ठेकेदारांना,नगरपरिषदेच्या अभियंत्यांना वेळोवेळी सूचना करीत आहेत.

मुख्यत्वे माथेरानला धुळीचा मोठया प्रमाणावर त्रास पर्यटकांना तसेच व्यापारी वर्गाला सहन करावा लागत आहे. लवकरच दस्तुरी पासून ते पांडे रोड हा जवळपास चार किलोमीटरचा मुख्य रस्ता क्ले पेव्हर ब्लॉकने बनविण्यात येणार आहे त्यामुळे आगामी काळात धुळीचे प्रमाण नगण्य असणार आहे.पर्यटकांना भेडसावत असणाऱ्या काहीशा त्रुटीचे सुध्दा निराकरण होणार असून पर्यटक कशाप्रकारे वाढतील आणि नगरपरिषदेच्या उत्पन्नासह इथल्या कष्टकरी जनतेला रोजगार निर्मिती होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

**डॉ. प्रशांत जाधव --**
**मुख्याधिकारी माथेरान नगरपरिषद**

माथेरान हे सुंदर पर्यटनस्थळ आमचे एक कुटुंब असून सर्व नागरिक गुण्यागोविंदाने रहात आहेत. त्यामुळे या कुटुंबातील सदस्यांना कोणत्या उणिवा जाणवत असतात याकडे आमचे लक्ष असून हे गाव पर्यटनावर अवलंबून असल्याने पर्यटक वाढले तरच इथल्या नागरिकांना व्यवसाय प्राप्त होऊ शकतो त्यासाठी पर्यटन वाढीकामी आमचा प्रयत्न असून इथल्या विकास कामासाठी शासनाकडून भरीव निधी प्राप्त करून घेण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत.

**प्रेरणा प्रसाद सावंत**
**--नगराध्यक्षा माथेरान**

# श्रीवर्धनात माघी गणेशोत्सव उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये सर्वत्र माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साही आणि भावपूर्ण वातावरणात साजरा झाला. यावेळी बोर्लीपंचतन, शिस्ते, दिवे-आगर परिसरातील विविध मंदिरांमध्ये भाविकांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व नियम पाळून दर्शन घेतले.

ग्रामीण भागातून दैनंदिन रोजगार मिळवुन संसार चालविणारे कुटुंब आज मंगलमय व भक्तीपूर्ण वातावरणात एकत्रित आल्याचे चित्र दिसून आले. एक विचार व एक उत्सव अस सामाजिक ऐक्य निर्माण करणारा श्रीवर्धन तालुक्यातील शिस्ते गावातील पंचविसाव्या माघी गणेश उत्सव यावेळी धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. प्रत्येक वेळेला उत्सवात



सहभाग घेत उत्सव परिपूर्ण निर्माण करण्याचे काम येथील ग्रामस्थ करतात. यावेळी दोन दिवस आदी लगबग पाहायला मिळाली कार्यकर्ते या उत्सवात नव्या ऊर्जेने सहभागी होत गावाची स्वच्छता, विविध सुविधाकडे लक्ष वेधून कामे पहातात. या माघी गणेशोत्सवात ग्रामस्थांनी मंडपात भजन, कीर्तनाने नवचैतन्य निर्माण केले होते. सोमवारी सकाळी आरतीपासून श्रींच्या पुजेला सुरुवात झाली. त्यानंतर दुपारी १२ वाजता मंदिरामध्ये पाळणा बांधून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. आरती, गणेशपूजन त्यानंतर मंदिरामध्ये महाप्रसादाचेही वाटप करण्यात आले. उत्सव कार्यक्रमात पाहुण्यांसह सर्वच ग्रामस्थ एक वेगळा दिवस म्हणून भक्तिमय वातावरणात मग्न झाल्याचे दिसत होते.

## पनवेल महानगरपालिका
**ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

कार्यालय जा.क्र.पमपा/करपट्टी ७/४८२/२०२१ दिनांक : १२/०२/२०२१

**(वाचा : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावात बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून, त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्रं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १४ | सर्व्हे क्रमांक ४८३,४८४ बिल्डींग नं.२४ सदनिका क्रमांक ४०१, महावीर वाटीका साईनगर पनवेल | मे.सुपर कंन्स्ट्रक्शन कंपनी मे.अभिषेक इंटरप्रायझेस महावीर पुनिया व इतर | सुभाष नारायण सुर्यवंशी संध्या सुभाष सुर्यवंशी |
| २ | ९ | प्रॉपर्टी क्रमांक ८३८, ८३८/१, ८३८/२ब सदनिका क्रमांक बी ३०१, आदित्य श्रीराम टपाल नाका, पनवेल | मधुकर स.पन्हाळे व इतर | प्रशांत मधुकर पन्हाळे |
| ३ | ९ | प्रॉपर्टी क्रमांक ८३८, ८३८/१, ८३८/२ब सदनिका क्रमांक बी ३०२, आदित्य श्रीराम टपाल नाका, पनवेल | मधुकर स.पन्हाळे व इतर | प्रशांत मधुकर पन्हाळे |
| ४ | ९ | प्रॉपर्टी क्रमांक ८३८, ८३८/१, ८३८/२ब सदनिका क्रमांक बी ३०२, आदित्य श्रीराम टपाल नाका, पनवेल | मधुकर स.पन्हाळे व इतर | प्रशांत मधुकर पन्हाळे |
| ५ | ९ | प्रॉपर्टी क्रमांक ८३८, ८३८/१, ८३८/२ब सदनिका क्रमांक बी ३०४, आदित्य श्रीराम टपाल नाका, पनवेल | मधुकर स.पन्हाळे व इतर | प्रशांत मधुकर पन्हाळे |
| ६ | ९ | प्रॉपर्टी क्रमांक ८३८, ८३८/१, ८३८/२ब गाळा क्रमांक ६, आदित्य श्रीराम टपाल नाका, पनवेल | मधुकर स.पन्हाळे व इतर | प्रशांत मधुकर पन्हाळे |
| ७ | ९ | प्रॉपर्टी क्रमांक ८३८, ८३८/१, ८३८/२ब गाळा क्रमांक १०२/१, आदित्य श्रीराम टपाल नाका, पनवेल | मधुकर स.पन्हाळे व इतर | प्रशांत मधुकर पन्हाळे |
| ८ | ९ | प्रॉपर्टी क्रमांक ८३८, ८३८/१, ८३८/२ब गाळा क्रमांक १०२/२, आदित्य श्रीराम टपाल नाका, पनवेल | मधुकर स.पन्हाळे व इतर | प्रशांत मधुकर पन्हाळे |
| ९ | ११ | फा.प्लॉट नं.८५, सदनिका क्र.१०१ कमलेश संकुल, पनवेल | कमळ हुंडप्पा सकपाळ व इतर | जयश्री नितीन सकपाळ |
| १० | ११ | फा.प्लॉट नं.८५, सदनिका क्र.१ कमलेश संकुल, पनवेल | कमळ हुंडप्पा सकपाळ व इतर | जयश्री नितीन सकपाळ |
| ११ | ११ | फा.प्लॉट नं.८५, सदनिका क्र.३०१ कमलेश संकुल, पनवेल | कमळ हुंडप्पा सकपाळ व इतर | नितीन हुंडप्पा सकपाळ |
| १२ | ११ | फा.प्लॉट नं.८५, सदनिका क्र.२०१ कमलेश संकुल, पनवेल | कमळ हुंडप्पा सकपाळ व इतर | नितीन हुंडप्पा सकपाळ |
| १३ | १३ | फा.प्लॉट नं.४१९, सदनिका क्र.बी १६ चॅनेल रेसिडेन्सी, तक्का, पनवेल | माधव संजय शेट्टी | जाहना आन्टनी चेरियान |
| १४ | १६ | फा.प्लॉट नं.४४५, सदनिका क्र.ए १०३ नॅशनल रेजन्सी, तक्का, पनवेल | अब्दुल मनारअली कापडी शोएब सत्तार कापडी व इतर १ | शीहाब अब्दुल सत्तार कापडी |
| १५ | १० | प्रॉपर्टी क्र.१३४३/४४, गाळा क्र.०५ नित्यानंद कृपा, पनवेल | वामन रामचंद्र देवधर | तनुजा रामानंद बेडेकर |
| १६ | १३ | फा.प्लॉट नं.४२९, सदनिका क्र.बी ३०१ पामरुची, तक्का, पनवेल | योगेश कमळाकर भोगावकर व इतर | निशिता निलेश भोगावकर |
| १७ | ९ | फा.प्लॉट नं.४६४, गाळा क्र.३२, मार्केट यार्ड, पनवेल | मे.कृषी उत्पन्न बाजार समिती | रामभाऊ लक्ष्मण दळवी |
| १८ | ५ | प्रॉपर्टी क्र.७०५, ७०९, ७१०/२ पैकी गाळा क्र.१, दत्तराज को.ऑप.हौ.सो.पनवेल | अनंत दत्तात्रेय नातू | विश्वेश अनंत नातू |
| १९ | ७ | प्रॉपर्टी क्र.१४९, १४९/१, १४९/२ पनवेल सदनिका क्र.१०२, समीर कॉम्प्लेक्स | कौसरजाहाँ शहाबुद्दीन नुरी | बिलकिस लतीफ शेख |
| २० | १३ | फा.प्लॉट नं.४१७, ४१८, तक्का, पनवेल सदनिका क्र.बी १०२, निलसिद्धी गार्डन्स | संजीव मकरंद पाटणकर व इतर | अखिल अन्टनी चेरियान जेहना अन्टनी चेरियान |
| २१ | १६ | फा.प्लॉट नं.४४८, ४४८/४, ४४९/२ सदनिका क्र.४०३, मोराज, तक्का, पनवेल | सचिन भिवराज ठाकूर | अमोल दिलीप सावंत |
| २२ | ११ | फा.प्लॉट नं.६९, सदनिका क्र.१०३, गोविंद निलायम, पनवेल | प्रकाश नरहर रानडे व इतर १ | अमित शशिकांत जगे शिला शशिकांत जगे |
| २३ | १६ | फा.प्लॉट नं.४४८,४४८ए,४४९/२, पनवेल सदनिका क्र.२०२, पी-३, मोराज तक्का | अलझिरा रोवे | नाना भिमराव चव्हाण वंदना नाना चव्हाण |
| २४ | १० | प्रॉपर्टी क्र.१३४३/४४, सदनिका क्र.१०४ नित्यानंद कृपा, पनवेल | वामन रामचंद्र देवधर | तनुजा रामानंद बेडेकर |
| २५ | ११ | फा.प्लॉट नं.८६/७, सदनिका क्र.९ आकांक्षा को.ऑप.हौ.सो.पनवेल | गजानन विठ्ठल खरे व इतर | भावना भालचंद्र पाटील भालचंद्र हंसराज पाटील |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असेलस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा.आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# श्री ज्येष्ठराज विनायक गणपती मंदिरातर्फे पाच लाखांची मदत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये माघी गणेशोत्सव उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणामध्ये साजरा होत आहे. पनवेल शहर आणि ग्रामीण भागामध्ये असणाऱ्या गणेश मंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांची गर्दी लोटली आहे. भक्तिमय वातावरण गणेश मंदिरात आहे. आधी मंदीरापुरता मर्यादित असलेला माघी गणेशोत्सव आता सार्वजनिक मंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पनवेलसारख्या ठिकाणी साजरा होऊ लागला आहे. त्याचप्रमाणे घरगुती स्वरुपातही माघी गणेशोत्सव साजरा होत आहे. पनवेलमधील अनेकांचं श्रद्धास्थान असलेलं ३२५ वर्षांचे पुरातन प्रसिद्ध श्री ज्येष्ठराज सिद्धिविनायक गणपती मंदिरातर्फे पुढील वर्षभर डायलिसिसच्या प्रत्येकी ३ पेशंट्सना आठवड्यातून प्रत्येकी २-२ वेळा मोफत उपचार देण्यासाठी डायलिसिस सेंटर चालविणाऱ्या रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेलला आज रुपये ५ लाख इतक्या देणगीचा चेक आज देण्यात आला. यावेळी मंदिराचे अध्यक्ष मुरलीधर जोशी यांसह ट्रस्टी विजय जोशी, जगन्नाथ जोशी, ऍड प्रथमेश सोमण, आनंद काळे, शरद जोशी, श्रीराम वत्सराज तसेच रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेलचे विलास कोठारी उपस्थित होते.

मा.पांडे यांचे कोर्ट

ॲड.राजकुमार व्ही.जाधव
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१६६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०३/२०२१

सौ.ज्योती जयेंद्र सराफ — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका,
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.त्रिंबक कृष्ण उर्फ कृष्णाजी फडके हे अर्जदार यांचे नात्याने पंजोबा असून ते दि.३१/१२/१९३९ रोजी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी अर्जदार सौ.ज्योती जयेंद्र सराफ यांनी जन्म-मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.त्रिंबक कृष्ण उर्फ कृष्णाजी फडके यांच्या मृत्यूची नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालय वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची जन्म-मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.त्रिंबक कृष्ण उर्फ कृष्णाजी फडके यांच्या मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबत दाखल केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.१५/०२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.गुरुनाथ दत्ता भगत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी सो.वर्ग १ यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.२०३/२०२०
ने.ता.१८/३/२०२१

श्री.प्रकाश रुगाराम चौधरी
वय : ३० वर्षे, व्यव : नोकरी
रा.मिडलक्लास हौसिंग सोसायटी,
रुम नं.जी-०२, कुसूम अनंत टॉवर,
प्लॉट नं.१२, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
निबंधक
जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी
महानगरपालिका पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांच्या मुलाचा मनित प्रकाश चौधरी जन्म तारीख १०/०३/२०१७ रोजी मिडलक्लास हौसिंग सोसायटी, रुम नं.जी-००२, कुसुम अनंत टॉवर, प्लॉट नं.१२, पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६ येथे राहत्या घरी झालेला आहे. तशी जन्माची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.२०३/२०२० दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदाराचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : १५/०२/२०२१

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मा.मुजावर साहेब कोर्ट
प्रोसेस जमा रु.५०/- — अर्जदारतर्फे वकील
ॲड.सचिता नंदकुमार गायकवाड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज, (सिनिअर डिव्हीजन) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.८३५/२०२०
नि.नं.७
ने.ता.२५/२/२०२१

१) श्री.संजीव ओमप्रकाश अरोरा व इतर २ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. ओमप्रकाश जयगोपाल अरोरा हे दि.२०/०५/२०२० रोजी मयत झालेले असून त्यांच्या पत्नी कै.रमन ओमप्रकाश अरोरा या देखील दि.२९/०५/२०१५ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील फ्लॅट नं.२०२, ए विंग, लिली बिल्डींग, चॅनेल उपवन, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदार हे कै.ओमप्रकाश जयगोपाल अरोरा यांच्या वारस हक्कासंबंधी गहाण, दान, बक्षिस, लीज, लीन, साठेकरार, तारण, कुळहक्क, खरेदी, विक्री अथवा तत्संबंधित कोणत्याही हक्काने अगर अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधित व्यक्तीने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलामार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीसीच्या मुदतीत अन्य कुणाचीही हरकत वगैरे न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदारांच्या लाभांत वारस दाखला दिला जाईल, याची संबंधित व्यक्तींनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.११/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल